महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा येथे मुलांच्या वसतीगृह इमारतीच्या बांधकाम - सुधारित प्रशासकीय मान्यता

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक मपवि २०२२/प्र.क्र.३७/पदुम २ (माफसू)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६.

वाचा :- १) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. मपवि २०२२/प्र.क्र.३७/पदुम २ (माफसू), दिनांक २४ जून, २०२२.
२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१७ / प्र.क्र.१२१ / इमारती-२, दिनांक २७ सप्टेंबर, २०२२
३) वित्त विभाग शासन निर्णय क्र. व्यअस २०२६/प्र.क्र.१४/अर्थसंकल्प-२, दि. ०२ जून, २०२६
४) कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे जा.क्र. मपमविवि / बांधकाम/२५५/२०२६, दिनांक ०४ जून, २०२६ रोजीचे पत्र

प्रस्तावना -

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ येथे मुलांच्या वसतीगृह इमारतीच्या बांधकामाच्या वाचा क्र. १ येथील दि. २४ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. १५९२.२० लक्षच्या प्राथमिक अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर बांधकामास प्रशासकीय मान्यता देतांना वस्तु व सेवाकर १२ टक्के गृहित धरण्यात आला आहे. परंतू वाचा क्र. २ येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय कंत्राटाच्या वस्तु व सेवाकरामध्ये १२ टक्केवरुन १८ टक्के अशी वाढ केलेली आहे.

त्याअनुषंगाने वाचा क्र. ४ येथील पत्रान्वये कुलसचिव यांनी क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ येथील मुलांच्या वसतीगृह इमारतीच्या बांधकामाचा रु. १६.३० कोटीचा सुधारित मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालय, शिरवळ येथे मुलांच्या वसतीगृह इमारतीच्या बांधकामास सुधारित रु. १६,३०,९२,२६७/- (अक्षरी सोळा कोटी तीस लाख ब्यांण्णव हजार दोनशे सदुसष्ट फक्त) इतक्या रक्कमेस या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

क्र.		तपशील	दि. २४/०६/२०२२ च्या प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची किंमत	सुधारित प्रशासकिय मान्यता	वाढ/घट
1		2	3	4	5
1	i	Building	9,30,03,040/-	11,56,43,848/-	1,39,90,656/-
	ii	Rain roof water harvesting	1,00,000/-		
	iii	Water supply & sanitary work	46,50,152/-		
	iv	Miscellaneous & optional, Item:- Internal road, Land development, Land scaping & gardening	39,00,000/-		
		Sub Total (i+ii+ii+iv)	**10,16,53,192/-**	**11,56,43,848/-**	**1,39,90,656/-**
2		Soil investigation	1,00,000/-	95,798/-	-4,202/-
3	i	Electrification	1,04,30,334/-	96,00,000/-	-15,30,334/-
	ii	CCTV	2,00,000/-		
	iii	AB room, area lighting	5,00,000/-		
		Sub Total(i+ii+iii)	**1,11,30,334/-**	**96,00,000/-**	**-15,30,334/-**
4		Furniture	1,25,20,000/-	96,80,584/-	-28,39,416/-
5		**Project Cost (1+2+3+4)**	**12,54,03,526/-**	**13,50,20,130/-**	**96,16,604/-**
6		Contingencies 4%	37,20,122/-	7,32,983/-	-29,87,139/-
7		GST on 5	1,50,48,423/-	2,43,03,623/-	92,55,200/-
8		Price Escalation 10%	1,25,40,353/-	11,54,478/-	-1,13,85,875/-
9		Labour Insurance 0.5%	6,27,018/-	-	-6,27,018/-
10		PMC/Architect 1.5%	18,81,053/-	18,81,053/-	0.00
		Total Cost of Project	**15,92,20,494/-**	**16,30,92,267/-**	**38,71,773/-**

२. या बाबीकरिता येणारा खर्च महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाला "मागणी क्रमांक डी -४, २४०३ पशुसंवर्धन, १०९ विस्तार व प्रशिक्षण, (००) (१९) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाची स्थापना, (२४०३ २०९२) कार्यक्रमांतर्गत, ३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान" या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. व्यअस २०२६/ प्र.क्र. १४/अर्थसंकल्प-२, दिनांक ०२ जून, २०२६ मधील तरतूदीन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०२६०८०६१८११३९३७४५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.08.06 18:12:45 +05'30'

(नि. भा. मराळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. कुलसचिव/नियंत्रक (वित्त व लेखा), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
२. महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
३. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
४. कार्यासन (व्यय २), वित्त विभाग, मंत्रालय मुंबई - ४०००३२
५. कार्यासन (इमारती-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई - ४०००३२
६. निवड नस्ती/ पदुम -२ (माफसू).